प्रबोधन
गोरेगाव

# अकरावा वार्षिक अहवाल

## १९८२-८३

# प्रबोधन गोरेगाव

## ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**प्रबोधन गोरेगाव** या संस्थेची ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १० डिसेंबर १९८३ रोजी रात्री ९ वा.** गणपती भुवन, म. गांधी मार्ग, गोरेगाव [पश्चिम], मुंबई-६२ येथील संस्था कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. सन १९८२-८३ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद [हिशेब तपासनीसांच्या अहवाला सह] वाचून मंजूर करणे.

३. नवीन वर्षाकरिता [१९८३-८४] घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष [१ जागा] उपाध्यक्ष [२ जागा] व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. [एकूण ६ जागा]

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५. अध्यक्षांचे अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन
**विजय नाडकर्णी**
कार्याध्यक्ष

गोरेगाव मुंबई-६२.
दिनांक १४ नोव्हेंबर १९८३

**विलास देवळकर**
प्रमुख कार्यवाह

---

**विशेष सूचना :** १] संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ गणपती भुवन, लो. टिळक नगर रस्ता क्र. ३, गोरेगाव [प] येथील संस्थेच्या कार्यालयात दि. ५-१२-१९८३ ते ७-१२-१९८३ पर्यंत रोज रात्री ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येईल.

२] कोणाहि सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या लेखी दिनांक ८-१२-१९८३ पूर्वी कार्याध्यक्षांकडे सादर कराव्यात.

३] गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

४] निवडणूकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. ८-१२-१९८३ पूर्वी संस्था कार्यालयात रात्री ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# प्रबोधन गोरेगाव

## ११ वा वार्षिक अहवाल
## १९८२—८३

*प्रबोधन गोरेगाव* या संस्थेच्या कार्याचा दि. १ जुलै १९८२ ते ३० जून १९८३ पर्यंतच्या, अकराव्या वर्षाचा अहवाल व हिशोब पत्रके आपणांस सादर करतांना कार्यकारी मंडळास अतिशय आनंद होत आहे.

*कार्यकारी मंडळ आणि सभा :*

या अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण १० सभा घेण्यात आल्या. सभांना सरासरी ११ सदस्य उपस्थित होते. स्वीकृत सभासदासह कार्यकारी मंडळाची सभासद संख्या एकूण १८ होती.

*उपक्रम आणि कार्यक्रम :*

संस्थेने या वर्षी अकराव्या वर्षात पदार्पण केले. गेल्या दहा वर्षात सुरू केलेले सर्व उपक्रम संस्थेने क्रियाशील कार्यकर्ते व हितचिंतकांच्या जोरावर सातत्याने सुरू ठेवले आहेत. दरवर्षी एखादा नवा रचनात्मक उपक्रम हाती घेण्याचा संस्थेचा मानस असतो. हे सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी झटणाऱ्या क्रियाशील कार्यकर्त्यांनी कार्यात ढिलाई येऊ दिलेली नाही, त्यामुळेच सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात संस्था नावारूपास आली आहे, ह्याचा संस्थेस अभिमान वाटतो.

*प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा ( वर्ष १० वे )*

या चढाओढीच्या काळांत दुसऱ्यावर आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पाडण्यासाठी वक्तृत्व कला अंगी असणे आवश्यक आहे. ती वक्तृत्व कला विद्यार्थ्यांच्या अंगी बाणावी, ह्या हेतूने प्रेरित होऊन संस्थेने १९७३ साली सुरू केलेल्या वक्तृत्व स्पर्धेने यंदा दहाव्या वर्षात पदार्पण केले. अखिल महाराष्ट्रातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी – विद्यार्थिनी ह्या स्पर्धेत भाग घेत असल्याने स्पर्धेस खरेखुरे स्पर्धात्मक स्वरूप प्राप्त होते. जळगाव, पुणे, कोल्हापूर, इ. दूरच्या ठिकाणाचे विद्यार्थी - विद्यार्थिनी ह्या स्पर्धेत भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी करीत असतात.

या दशवार्षिक स्पर्धेच्या निमित्ताने मागील दहा वर्षांच्या स्पर्धांच्या वाटचालीचा आढावा घेणारी एक पुस्तिका ह्या प्रसंगी प्रकाशित करण्यात आली. दि ३ ऑक्टोबर १९८२ रोजी पाटकर महाविद्यालयातील सभागृहात विद्यार्थी, पालक, शिक्षक, व अन्य रसिकांच्या भरगच्च उपस्थितीत या स्पर्धा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. शालेय गटाच्या सांघिक विजयाचा *कै. दादासाहेब रेगे स्मृती प्रबोधन फिरता करंडक* अंधेरीच्या परांजपे विद्यालयाने पटकाविला. महाविद्यालयीन गटात हाच बहुमान राम नारायण रूईया महाविद्यालयाने संपादन करून " *कै. जगदिश कुलकर्णी स्मृती प्रबोधन फिरता करंडक* मिळविला.

स्पर्धेचे परीक्षण प्रा. म. ब. पळशीकर, प्रा. सुधीर पानसे, सौ. सातपुते, सौ. कमल अभ्यंकर यांनी केले.

## एकांकिका स्पर्धा ( वर्ष ११ वे )

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीहि हौशी नाट्यसंस्थांच्या मराठी एकांकिकांची स्पर्धा १० फेब्रुवारी ८३ ते १३ फेब्रुवारी ८३ पर्यंत घेण्यात आली. ह्या स्पर्धेस संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक इच्छुक नाट्यसंस्थांचे अर्ज आले होते. ही एकच गोष्ट संस्थेच्या ह्या स्पर्धेस हौशी नाट्यसंस्थांच्या वर्तुळात मानाचे त्याचप्रमाणे कौतुकाचे स्थान आहे, हे सिद्ध करण्यास पुरेशी आहे. परंतु सुसज्ज नाट्यगृहाचा अभाव, आर्थिक व वेळेची मर्यादा इत्यादी तांत्रिक कारणाने सर्वच इच्छुक नाट्य-संस्थांना स्पर्धेत प्रवेश देता येत नाही. तरी सुद्धा कार्यकारी मंडळ निवड करीत असलेल्या सर्व एकांकिका गुणवत्तेच्या निष्कर्षांवर घेतून घेतल्या जातात. त्यानुसारच आलेल्या अनेक अर्जांतून १६ एकांकिकांची निवड करण्यात आली. त्यातून '*सामित्र गोरेगाव*' या संस्थेच्या "*मनू आणि मासा*" या एकांकिकेस कै. केशवराव दाते चषक व रोख रु. ५००/- देऊन सर्वोत्कृष्ट प्रयोगाबद्दल गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण श्री. राजा कारळे, श्री. शशी भालेकर व श्री. शरद सापळे यांनी केले, तर श्री. विनायक चासकर [ दूरदर्शन नाट्यदिग्दर्शक ] यांनी विजेत्यांना पारितोषिके वितरीत करुन नाट्यकलाकारांचा गौरव केला.

## एस् एस्. सी. व्याख्यानमाला ( वर्ष ११ वे )

कला - ज्ञान - सेवा ह्या आपल्या ब्रीदास अनुसरुन संस्थेने प्रतिवर्षा प्रमाणे ह्या वर्षी सुद्धा ज्ञानदानाचे सत्र अर्थात ' एस. एस्. सी. व्याख्यानमाला ' आयोजित केली होती. अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन हे व्याख्यानमालेचे असणारे वैशिष्ट्य ह्यावर्षीसुद्धा कटाक्षाने पाळण्यात आले. राष्ट्रपती पारितोषिक विजेते शिक्षक श्री. एस. वाय. गोडबोले व त्यांचे सहकारी शिक्षक ह्यांचा ह्या कामी पुढाकार लाभला होता. दि. २१ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी ८३ ह्या काळांत ही व्याख्यानमाला राजस्थान भवन, गोरेगाव [पश्चिम] येथे अत्यंत शिस्तपूर्ण वातावरणात पार पडली. या व्याख्यान-मालेची उपयुक्तता पालकांनी व अन्य शिक्षकांनी सुद्धा येऊन व्यक्त केलेल्या आभार व अभिप्रायावरुन सिद्ध होते.

## अकरावा वर्धापनदिन समारंभ

१४ एप्रिल १९८३ रोजी गुढीपाडव्यास संस्थेस ११ वर्षे पूर्ण झाली. त्याचदिवशी संस्थेच्या ' गणपती भुवन, ' ३ रा मजला, म. गांधी मार्ग, गोरेगाव (पश्चिम), ' येथील नवीन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यानिमित्ताने गणपती पूजन संस्थेचे अध्यक्ष श्री. भाई सावंत ह्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. संस्थेचे अनेक सभासद, कार्यकर्ते, हितचिंतक व गोरेगावातील अनेक मान्यवर मंडळी सहकुटुंब उपस्थित राहिल्याने, ह्या सोहळयास केवळ औपचारिक स्वरुप न येतां खरेखुरे कौटुंबिक स्वरुप प्राप्त झाले. संस्थेच्या सभासदांसाठी 'हॅण्डस् अप' हे नाटक दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले येथे दाखविण्यात आले. त्याप्रसंगी एका छोट्याश्या पण शानदार समारंभात मार्च १० वी परीक्षेत गोरेगावातील शाळांमधून सर्वप्रथम आलेल्या कु. राजन जोशी ह्यास रु. १००/- चे रोख पारितोषक देऊन त्या बहुमाना बद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. तसेच मराठी, इंग्रजी व गणित या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनाही प्रत्येकी रु. ५१/- चे रोख पारितोषक देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून "मुंबई मराठी पत्रकार संघा" चे अध्यक्ष *श्री. कुमार कदम* हे उपस्थित होते.

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध परिक्षा अभ्यास वर्ग

राष्ट्राच्या उन्नतीसाठी बुद्धिमान व्यक्तिंची गरज असल्यामुळे **नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग**

**(NCERT)** दिल्ली तर्फे प्रतिवर्षी घेतली जाणारी राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा ही बुद्धिमान मुलांचा मागोवा घेण्याच्या दृष्टीने उपकारकच ठरली आहे. अशा ह्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक परीक्षेस मराठी विद्यार्थ्यांचे प्रमाण अल्प असते, त्यात सतत वाढ होत रहावी ह्या हेतूनेच प्रबोधन हा अभ्यास वर्ग आयोजित करीत असते. उपनगरांतील विशेषतः अंधेरी ते दहिसर परिसरांतील विद्यार्थ्यांच्या खास सोईसाठी हा वर्ग दि. ३ एप्रिल ते १७ एप्रिल १९८३ पर्यंत पाटकर महाविद्यालय गोरेगाव येथे प्रा. द. बि. वाटवे ह्यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. ह्या वर्गाचा लाभ ५० विद्यार्थ्यांनी घेतला.

### *मनोरंजन :*

दरम्यान संस्थेच्या सभासदांना ' छू मंतर ' व ' बावनखणी ' ही नाटके दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले येथे विनामूल्य दाखविण्यात आली.

### *प्रबोधन बालवाचनालय :*

आपल्या राष्ट्राचे उद्याचे आधारस्तंभ व शिल्पकार असणाऱ्या बालकांवर सुसंस्कार व्हावेत, ह्या हेतूने त्यांच्यावर उत्तमोत्तम संस्कार करणाऱ्या पुस्तकांचे बालवाचनालय प्रबोधन तर्फे विनामूल्य चालविले जाते. ह्या बालवाचनालयाच्या ५ शाखा असून त्यांमधून १००० शालेय विद्यार्थी लाभ घेत असून सर्व शाखांमध्ये मिळून ३००० उत्तमोत्तम पुस्तकांचा संग्रह आहे.

### *प्रबोधन बालवाडी :*

समाजाच्या अविकसित घटकांना उपयुक्त ठरणारे उपक्रम प्रबोधन यथाशक्ति आयोजित करीत असते. त्या नुसारच जवाहर नगर व तीन डोंगरी (गोरेगाव) येथील झोपडपट्टी विभागात दोन बालवाड्या प्रबोधन तर्फे विनामूल्य चालविण्यात येतात. ह्या दोन्ही बालवाड्यात मिळून असलेल्या १०० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. असे शिक्षण घेतलेल्या मुलांनी पुढे शालेय शिक्षणात विशेष चमक दाखविल्याचे नजरेस आले आहे. अशा बालवाड्या आपल्या विभागात सुरु करण्यात याव्यात अशी अनेकांची मागणी असून, संस्थेचा त्या दिशेने प्रयत्न सुरु आहे.

### *प्रबोधन क्रीडा महोत्सव (वर्ष ५ वे) :*

पश्चिम उपनगरांत गेल्या चार वर्षांपासून सतत आयोजित होत असलेल्या महत्वाकांक्षी उपक्रमाने एक शान आणली आहे.

यंदाचा पंचवार्षिक महोत्सव दि. ८ व ९ जाने. ८३ रोजी सिद्धार्थ नगर क्रीडांगण, गोरेगाव (पश्चिम), येथे साजरा करण्यात आला त्यास एशियाडची एक आगळीच पार्श्वभूमि लाभली होती. एशियाडच्या धर्तीवरच ह्या महोत्सवात क्रीडा ज्योत महोत्सवातील माजी क्रीडापटु कु. उल्का देशपांडे हिच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. त्याच प्रमाणे एशियाडच्या शानदार उद्घाटन सोहळ्यात भाग घेतलेल्या **नेताजी पालकर व्यायाम शाळेच्या** लेझिम कला पथकाचा कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी आयोजित करण्यात आला होता. सहभागी क्रीडापटुंचे शिस्तबद्ध व गणवेशातील संचलन हे एक मोठेच आकर्षण ठरले. त्यामुळे ह्या क्रीडामहोत्सवास आगळे स्वरुप प्राप्त झाले. उपस्थित प्रेक्षक, विद्यार्थी, पालक व शिक्षक ह्यांची सोय व्हावी म्हणून प्रशस्त स्टॅण्ड व मंडप उभारण्यात आले होते. त्यांच्या भरगच्च उपस्थितिमुळे ह्या रंगतदार सोहळ्यास खरेखुरे महोत्सवी स्वरुप प्राप्त झाले. ह्या क्रीडामहोत्सवात कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक्स व लोकनृत्य या विभागांमध्ये १५०० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपले क्रीडा नैपुण्य दाखविले. सिद्धार्थ नगरचे क्रीडांगण त्यासाठी खास समतल करुन घेण्यात आले. विजेत्यांना पदके व प्रशस्तिपत्रके, तर विजेत्या-संघाना करंडक देण्यात आले. ह्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट विजेत्या संघाचा मान **'आदर्श विद्यालय', गोरेगाव**

यांनी पटकावून प्रबोधनचा भव्य करंडक जिंकला.

या महोत्सवासाठी विविध क्रीडा संघटनांनी व क्रीडाधिकाऱ्यांनी विशेष सहाय्य दिले.

या स्पर्धेचे उद्घाटन 'मुंबई सकाळ' चे संपादक श्री. माधव गडकरी यांच्या शुभहस्ते करण्यात आले व बक्षिस समारंभ क्रीडा महर्षी श्री. शंकरराव साळवी यांच्या शुभहस्ते पार पाडण्यात आला.

*खंत* :

संस्थेच्या प्रत्येक उपक्रमास रसिकांकडून जरी भरघोस प्रतिसाद मिळत असला तरी संस्थेच्या सभासदांच्या बाबतीत एक खंत कार्यकारी मंडळास व्यक्त करावीशी वाटते, ती अशी की, मनोरंजनार्थ दाखविण्यात येणाऱ्या नाटकांव्यतिरिक्त अन्य कार्यक्रमास संस्थेच्या सभासदांची उपस्थिती अल्प असते. संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या प्रत्येक कार्यक्रम सोहळयास आवर्जून उपस्थित रहावे, अशी विनंती कार्यकारी मंडळ करीत आहे.

*सभासद वर्गणी* :

मागील दहा वर्षांत संस्थेच्या कार्याचा विविध उपक्रमाद्वारे विस्तार झाला. या अवचित वाढल्या भाव पातळीमुळे सर्व तऱ्हेच्या खर्चामध्ये मोठी वाढ झालेली आहे. सभासदासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या नाट्यप्रयोग आदि करमणुकीच्या कार्यक्रमांचे खर्चही वाढले आहेत. अशा स्थितीत गेली दहा वर्षे स्थिर असलेली सभासद वर्गणी वाढविण्याचा निर्णय अपरिहार्य ठरला. दि. ५ मार्च १९८३ रोजी झालेल्या संस्थेच्या १० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने एकमताने ठराव करुन संस्थेचे पुढील प्रमाणे बदललेले सभासद वर्गणीचे दर मंजूर केले –

| | | |
|---|---|---|
| वार्षिक सभासद | रु. २५/- | [प्रतिवर्षी] |
| आजीव सभासद | रु. २५०/- | [एकदाच] |
| आश्रयदाते | रु. १००१/- किंवा अधिक | [एकदाच] |

प्रवेश शुल्क मात्र पूर्वीचेच म्हणजे रु. २/- कायम ठेवण्यात आले आहे.

वरील वर्गणीचे दर दि. ६ मार्च १९८३ पासून अमलात आले असून सभासदांचे या संदर्भात सहकार्य अपेक्षित आहे.

*धन्यवाद* :

संस्थेने आजवर केलेल्या कार्यात असंख्य हित चिंतकांचा, सभासदांचा व कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकार व इतर सेवाभावी संस्था यांच्या सक्रीय सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले. संस्थेचे सरकारमान्य हिशोब तपासनीस मेसर्स एस्. एस्. नायक आणि कं. व अंतर्गत हिशोब तपासनीस श्री. रामचंद्र जोशी यांनी बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. बृहन्मुंबई महानगर पालिकेने यावर्षी संस्थेला रु. ५०,००० चे अनुदान दिले. या बहुमोल उदार मदती बद्दल संस्था महापालिकेची व अनुदान समिती वरील नगरसेवक सदस्यांची अत्यंत ऋणी आहे. अशा सर्व संबंधितांचा लोभ सदैव कायम राहील असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र

**कार्यकारी मंडळ (१९८२-८३)**

**प्रबोधन गोरेगाव**

# प्रबोधन गोरेगाव द्वारा आयोजित
# विविध शैक्षणिक उपक्रम

---

- एस. एस. सी. विद्यार्थी मार्गदर्शन व्याख्यानमाला [प्रतिवर्षी फेब्रुवारी महिन्यात]
- गोरेगाव विभागातून एस. एस. सी. परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व रोख पारितोषिके
- प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा : अखिल महाराष्ट्रातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी [प्रतिवर्षी सप्टेंबर महिन्यात]
- प्रबोधन बिनामूल्य बाल वाचनालय : इयत्ता ४ थी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी

  शाखा क्र. १ : प्रबोधन कार्यालय 'विद्युत' लो. टिळक नगर मार्ग क्र. ४, महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव [पश्चिम]

  शाखा क्र. २ : ७४, जयप्रकाश नगर, गोरेगाव [पूर्व]

  शाखा क्र. ३ : 'प्रयोग, मालाड' गणेशवाडी, चिंचवली, मालाड [प.]

  शाखा क्र. ४ : 'जयजवान' मालाड [पूर्व]

  शाखा क्र. ५ : 'ज्ञानदीप', मढ
- प्रबोधन बालवाडी :

  शाखा क्र. १ : प्लॉट क्र. ३३३, जवाहर नगर गोरेगाव [प.]

  शाखा क्र. २ : तीन डोंगरी झोपडपट्टी, गोरेगाव [प.]
- प्रबोधन क्रीडा महोत्सव : वांद्रे ते दहिसर परिसरातील माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा
- राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा अभ्यासवर्ग प्रतिवर्षी एप्रिल महिन्यात

**विद्यार्थी मित्रांनो ! या सर्व शैक्षणिक सेवांचा अधिकाधिक लाभ घ्या !!**

---

# भव्य कार्यक्रम

एकांकिका स्पर्धा : अखिल महाराष्ट्रातील हौशी कलाकारांसाठी [प्रतिवर्षी फेब्रुवारी महिन्यात]

वर्धापनदिन संमेलन : नाविन्यपूर्ण सांस्कृतिक सोहळा सोबत, आघाडीवरील कलाकारांचे लोकप्रिय कार्यक्रम [प्रत्येक गुढी पाडव्याला]

लोकप्रिय नाट्यप्रयोग : संस्था सभासदांसाठी

प्रबोधन' चे आजीव सभासदत्व घेऊन या रचनात्मक कार्यात सहभागी व्हा !

[वर्गणी रु. २५१ + २ = रु. २५३]

# प्रबोधन गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [ Regn. No. Bom 49/72 GB BSD ]

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. F 2502 Bom]

( १९८२-८३ )

अध्यक्ष : श्री. निळकंठ ज. सावंत

उपाध्यक्ष : श्री. प्रभाकर ज. मोडक डी.एम.आी,डी.आी.ओ.

श्री. शरद खुन्ते बी.ए.

## कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : श्री. विजय नाडकर्णी बी. ई. [ऑ.] सिव्हील

प्रमुख कार्यवाह : ,, विलास देवरुखकर बी. एस्सी. [ऑ.]

सह कार्यवाह : डॉ. मनोहर अदवानकर एम. एस्सी., पी. एच्. डी.

श्री सुरेश चव्हाण बी. ए.

कोषाध्यक्ष : ,, महादेव खानोलकर

-: सभासद :-

श्री. पद्माकर देसाई बी.एस्सी. [ऑ.]
,, सुरेश सैतवडेकर
,, गणपतराव सारंग जी. डी. आर्ट
,, दिलीप साळवी बी. एस्सी. [ऑ.]
,, सुरेश माईणकर
,, वसंत तावडे बी.ए.
,, नितीन शिंदे

श्री. सुभाष देसाई
,, दिनकर मालवणकर
,, चंद्रकांत ज. सावंत
,, गिरीश देसाई
,, विकास रेळे बी. ए., एल.एल.बी.
,, श्रीनिवास शिरसेकर

अंतर्गत हिशोब तपासनीस

श्री. रामचंद्र जोशी बी. कॉम.

सनदी लेखापाल

मे. एस. एस. नायक आणि कं.

कार्यालय :
गणपती भुवन, लोकमान्य टिळक नगर मार्ग क्र. ३,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव [प.],
मुंबई-४०० ०६२

संपर्क :
रंगसेवा
फिल्मिस्तान जवळ, स्वा. वि. मार्ग,
गोरेगाव [प.], मुंबई-४०० ०६२
दूरध्वनी ६९ ४१ ५७